06 JUL 2026

तरुण भारत

# कुलगुरूंचे औद्योगिक संधीवर मार्गदर्शन

कोल्हापूर : शतक महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन ७९ वर्षे पूर्ण करत असून ८० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व विविध उपक्रम राबवून साजरा करत आहे. याचाच एक भाग म्हणून मंगळवारी सकाळी साडे नऊ वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत हे मार्गदर्शन करणार आहेत. 'उद्योग शिक्षण समन्वय, नवतंत्रज्ञान व भविष्यातील औद्योगिक संधी' हा त्यांचा मार्गदर्शनाचा विषय आहे. हा कार्यक्रम कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या हॉलमध्ये होणार आहे. या कार्यक्रमास मान्यवर उद्योजक सभासद, संलग्न औद्योगिक व व्यापारी संस्थांचे पदाधिकारी तसेच निमंत्रितांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कमलाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.

0 6 JUL 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात अभियांत्रिकी प्रवेश सुरू

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेश प्रक्रियेअतंर्गत विद्यार्थी व पालकांसाठी स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (डिओटी) अधिविभागात प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन व स्क्रुटिनी सेंटर कार्यान्वित केले आहे.

स्क्रुटिनी सेंटरमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. केंद्रामध्ये महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (स्टेट सेट सेल) राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज नोंदणी, कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चिती (कन्फर्मेशन) तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण मार्गदर्शन दिले जात आहे.

प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू केली असून, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी निर्धारित मुदतीत अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी. विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे. स्क्रुटिनी सेंटरमध्ये डॉ. प्रवीण प्रभू, डॉ. चेतन आवटी, डॉ. महेश साळुंखे, डॉ. विश्वास पाटील, डॉ. गणेश पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

असे आहेत पदव्युत्तर अभ्यासक्रम

स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या पदवी अभ्यासक्रमांसह कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी आणि एन्व्हायर्नमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी या पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध आहे.

06 JUL 2026
तरुण भारत

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची १५ रोजी प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे. प्रवेश परीक्षा अर्ज प्रक्रिया पुर्ण झाली असुन प्रवेश अर्ज दाखल केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा बुधवार, दि. १५ रोजी दुपारी ४ ते ५ या वेळेत मानव्यशास्त्र इमारत येथे घेण्यात येणार आहे, असे समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी सांगितले. अद्याप ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी दि. १० जुलैपर्यंत प्रवेश अर्ज कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसहित जमा करावेत. प्रवेश अर्ज केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. या संधीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.